**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(४)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१६.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय:- कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ** :- (१) शासन परिपत्रक क्र.बीएड-४६१५/प्र.क्र.१६२/१५/मशि-२,दि.२१ ऑगस्ट,२०१५ व शासन पुरकपत्रक, समक्रमांक, दि. ०३ ऑक्टोबर, २०१५,
(२) शासन पत्र क्रमांक बीएड.४६१५/प्र.क्र.३३२/मशि-२, दि.१५.०३.२०१६,
(३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१५/ प्र.क्र.१६२/१५/बीएड./६०६०, दिनांक ११.०५.२०१६.

महोदय,

National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 अन्वये राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना एनसीटीईकडून सुधारीत मान्यतेचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. (१) येथील दिनांक २१.८.२०१५ च्या परिपत्रकान्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ तसेच भारतीय पुनर्वास परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून सुधारीत मान्यताप्राप्त शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. (२) येथील शासन पत्रान्वये सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर स्थापन केलेल्या पथकाने दिलेल्या शिफारशीनुसार संचालक, उच्च शिक्षण यांनी संदर्भ क्र. (३) येथील पत्रान्वये राज्यातील कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावावर शासनस्तरावर घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्यातील कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांतील ज्या बी.एड/एम.एड/बी.पी.एड./एम.पी.एड.अभ्यासक्रमांना यापुर्वी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे, अशा अभ्यासक्रमांना एनसीटीई/आरसीआय यांनी दिलेल्या सुधारित मान्यतेनुसार, मंजूरी दिलेल्या युनिटना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व सन २०१६-१७ करिता संबंधित शिखर परिषदेच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून व कायम विनाअनुदान तत्त्वावर खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय.,नवी दिल्ली यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील. एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय., नवी दिल्ली यांनी अभ्यासक्रमांची मान्यता रद्द केल्यास संबंधित अभ्यासक्रमासाठी शासनाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल.

२) एन.सी.टी.ई..भोपाळ/आर.सी.आय..नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.

३) एन.सी.टी.ई..भोपाळ/आर.सी.आय..नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या अटींची पुर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

४ बी.एड/एम.एड/बी.पी.एड./एम.पी.एड. अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५. दि.२३.५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मधील तरतुदीनुसार केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे अनुपालन न केल्याचे निदर्शनास आल्यास भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

५) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी काही महाविद्यालयांच्या बाबतीत एनसीटीईने मंजूर केलेल्या युनिटसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, शिक्षक व शिक्षकेतर वर्ग इत्यादी बाबत विहित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून शिफारस केलेली आहे. विभागीय सहसंचालकांनी सदर तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींबाबत संबंधित महाविद्यालयांना अवगत करावे. अशा महाविद्यालयांच्या बाबतीत एनसीटीईच्या तपासणीदरम्यान निकषांची पुर्तता न केल्याच्या कारणास्तव सदर युनिटची मान्यता रद्द झाल्यास, अशा युनिटना दिलेले शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्दबातल समजण्यात येईल.

६) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी केलेल्या सर्व शिफारशी शासनाच्या संदर्भाधिन क्र. २ येथील दि. २१/०८/२०१५ रोजीच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 च्या सुधारीत निकषांचो काटेकोर तपासणी करुन केलेल्या आहेत, या धारणेच्या अधीन राहून सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. भविष्यात या संदर्भात उद्भवणारी न्यायालयीन प्रकरण अथवा अन्य आक्षेपांची संपूर्ण जबाबदारी संबंधित सहसंचालकांची राहील.

President
Maharashtra Educat... Society
Mumbai - ...

( रोहिणी भालेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

सर्व संबंधित कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र/शारिरीक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत)

निवडनस्ती (मांश-२)